| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | 02/06/2014 |
| फैल तारीख | :– | 02/06/2014 |
| निकाल तारीख | :– | 05/05/2016 |
| कालावधी | :– | 01व. 11म. 03दि. |

**दापोली येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दापोली यांचे न्यायालयात**

**{ पिठासीन अधिकारी अ.ग.बेहेरे }**

**संक्षिप्त फौजदारी खटला कमांक. 157/2014.**

**निशाण क. 86.**

महाराष्ट्र सरकार फिर्यादी.

(द्वारा पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस स्टेशन गु.र.क. 12/2014.)

विरूध्द

1 किशोर भालचंद्र देसाई, वय – 52 वर्षे, आरोपी.

2 संदिप भालचंद्र देसाई, वय – 48 वर्षे,
क. 1 व 2 रा. श्रीरामनगर, जालगांव,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

3 सुनिल श्रीपत अबगुल, वय – 35 वर्षे,

4 अर्जुन भिवा अबगुल, वय – 58 वर्षे,

5 तुकाराम गोपाळ अबगुल, वय – 55 वर्षे,

6 मोहन मारूती अबगुल, वय – 29 वर्षे,

7 सुहास शिवराम जगदाळे, वय – 28 वर्षे,

8 यशवंत विठ्ठल अबगुल, वय – 57 वर्षे,

9 बाळाराम तुकाराम खामकर, वय – 40 वर्षे,
क. 3 ते 9 सर्व रा. साकुर्डे, अबगुलवाडी,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.
10 नरेंद्र दत्तात्रय करमरकर, वय – 41 वर्षे,
11 बळीराम सुडकोजी अबगुल, वय – 40 वर्षे,
क. 10 व 11 दोन्ही रा. कळंबट, खोतवाडी,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.
12 संतोष काशिराम खामकर, वय – 36 वर्षे,
13 वंदना यशवंत अबगुल, वय – 45 वर्षे,
14 ऋतुजा विकास अबगुल, वय – 25 वर्षे,
15 चंद्रकला चंद्रकांत अबगुल, वय – 42 वर्षे,
क. 3 ते 15 सर्व रा. साकुर्डे, अबगुलवाडी,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.
16 लक्ष्मी श्रीपत अबगुल (मयत).

सरकार पक्षातर्फे सहा.अभियोक्ता श्री. जाधव.
आरोपींतर्फे वकील श्री. एस. पी. बेलोसे.

**न्या य नि र्ण य**

( जाहीर दिनांक 05/05/2016.)

1. आरोपींवर भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 143, 147, 323, 352 सह 149 अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

2. सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, दि. 28/02/2014 रोजी सायंकाळी 4:30 वा.च्या सुमारास, फिर्यादी व साक्षीदार हे साकुर्डे अबगुलवाडी येथील विठ्ठल रखूमाई सभागृहात गेले असता आरोपींनी त्यांना अडवून येथून निघून जा असे सांगितले. तसेच आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना हातांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरूध्द दापोली पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविली. यादव, सहा. पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस स्टेशन यांनी सदर गुन्हयाचा तपास करून, आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

3. निशाणी 36 अन्वये आरोपींस गुन्हयाचा तपशील समजावून सांगण्यात आला. तो त्यांनी पूर्णपणे नाकारला व गुन्हयाच्या चौकशीची मागणी केली.

4. आरोपींवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी सरकार पक्षाने एकूण दहा साक्षीदार तपासले. साक्षीदार क. 1 मंगेश हा मूळ फिर्यादी व कथीत घटनेतील जखमी आहे. साक्षीदार क. 2 उन्मेष, साक्षीदार क. 3 पूजा, साक्षीदार क. 4 ज्योती, साक्षीदार क. 7 जयेंद्र, साक्षीदार क. 8 सरिता हे कथीत घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. साक्षीदार क. 5 दिनेश हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहे. साक्षीदार क. 6 महेश राजे कथीत घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व कथीत घटनेतील जखमी आहे. साक्षीदार क. 9 यादव, सहा. पोलीस निरीक्षक हे तपासी अंमलदार

असून साक्षीदार क्र. 10 डॉ. मुळे वैद्यकीय अधिकारी आहेत. आरोपींनी पूर्णपणे नकाराचा बचाव घेतला आहे. सर्व पुरावा पाहिला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

5. सर्व कागदपत्रांच्या पडताळणीवरून माझेसमक्ष खालील मुद्दे उपस्थीत झाले. त्यावर मी माझे कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे :-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | सरकार पक्ष हे शाबीत करते का की, दि. 28/02/2014 रोजी सायंकाळी 4:30 वा.च्या सुमारास, साकुर्डे अबगुलवाडी येथील विठ्ठल रखूमाई सभागृहात सर्व आरोपींनी गैरकायदा जमाव केला ? | नाही. |
| 2 | सरकार पक्ष हे शाबीत करते का की, सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून दंगल केला ? | नाही. |
| 3 | सरकार पक्ष हे शाबीत करते का की, आरोपींनी समान उद्दिष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदारांना हातांनी, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना इच्छेपूर्वक किरकोळ दुखापती केल्या ? | नाही. |
| 4 | सरकार पक्ष हे शाबीत करते का की, आरोपींनी समान उद्दिष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांच्या अंगावर धाऊन गेले ? | नाही. |
| 5 | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क 1 ते 5 करीता** :–

6. साक्षीदार क्र. 1 मंगेश राजे हा मूळ फिर्यादी व या कामातील सर्व साक्षीदार शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते आहेत याबाबत वाद नाही. आरोपी हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत याबाबत वाद नाही. याशिवाय साक्षीदार क्र. 1 मंगेश, साक्षीदार क्र. 2 उन्मेष, साक्षीदार क. 3 पुजा, साक्षीदार क. 4 ज्योती त्यांच्या उलटतपासात हे मान्य करतात की, पंचायत समिती निवडणूक होण्यापूर्वी संपूर्ण अबगुलवाडी शिवसेना पक्षाचे काम करत होती व सदर निवडणूकीच्यावेळी आरोपी राष्ट्रवादी पक्षात गेले व ते शिवसेनेत राहिले. त्यामुळे त्यांच्यातील राजकीय वैमनस्य स्पष्ट होते.

7. साक्षीदार क. 8 सरिता तिच्या जबाबात असे सांगते की, घटना अंदाजे 2 वर्षापूर्वी सायंकाळी 4:30 वा.च्या सुमारास घडली. त्यावेळी सभागृहामध्ये तिन वेळा घंटा वाजल्यानंतर ते गेले असता त्याठिकाणी मारामारी झाली. याशिवाय सदर साक्षीदार हिने काही न सांगितल्यामुळे सरकार पक्षातर्फे तिचा उलटतपास घेण्यात आला. परंतु काही साध्य झाले नाही. साक्षीदार क्र. 5 दिनेश च्या जबाबात घटनास्थळ पंचनामा शाबीत होऊन त्यास निशाणी 56 देण्यात आली असली तरी घटनास्थळावर कथीत घटनेच्या कोणत्याही खाणाखुणा दिसून न

आल्यामुळे आरोपींवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकला नाही.

8. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांपैकी साक्षीदार क. 1, 2 व 6 हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून साक्षीदार क. 7 हा त्यांचा चुलत भाऊ आहे. साक्षीदार क. 3 ही साक्षीदार क. 2 ची पत्नी असून, साक्षीदार क. 4 ही साक्षीदार क. 6 ची पत्नी आहे. अशाप्रकारे कथीत घटनेविषयी सांगणारा फिर्यादी व त्याच्या कुटुंबियाशिवाय एकही त्रयस्थ साक्षीदार सरकार पक्षाने याकामी तपासलेला नाही.

9. कथीत घटना दि. 28/02/2014 रोजी सायंकाळी 4 वा.च्या सुमारास घडली. या कामातील फिर्याद त्याचदिवशी रात्री 10:30 मिनिटांनी दाखल झाली आहे. म्हणजे तकार दाखल करण्यास जवळपास 6 तासांचा उशीर झाला आहे. सदर उशीर का झाला याचे कोणतेच स्पष्टीकरण सरकार पक्षाने पुढे आणले नाही.

10. सरकार पक्षाच्या म्हणण्यानुसार कथीत घटनेच्यावेळी साकुर्डे अबगुलवाडी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरणाच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रमाकरिता राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे लोक विठ्ठल रखूमाई सभागृहात जमले असताना कथीत घटना घडली. परंतु कथीत घटनेच्यावेळी रस्त्याच्या डांबरीकरणाच्या

भूमीपूजनाचा कार्यक्रम होता हे दाखविण्यासाठी सरकार पक्षाने कोणताही पुरावा पुढे आणलेला नाही.

11. साक्षीदार क. 2 उन्मेष त्याच्या जबाबात असे सांगतो की, त्यांच्या गावात दोन तट असून त्यांच्यात वाद आहे व सदर दोन्ही पक्षांतर्फे कोणीही मंदिराच्या सभागृहात राजकिय कार्यक्रम घ्यायचा नाही असे तहसिलदार यांना लिहुन दिलेले आहे. सर्व सरकारी साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार मंदिराच्या सभागृहात राजकिय पक्षाचा कार्यक्रम करायचा नाही असे ठरले असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सदर सभागृहात त्यांच्या पक्षाच्या वतीने अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणाच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामुळे फिर्यादी मंगेश व त्याचा भाऊ महेश यांनी सदर कार्यक्रमास विरोध केला असता आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केली. याउलट आरोपींनी घेतलेल्या बचावानुसार फिर्यादी व साक्षीदारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना सभागृहात येऊन मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाचा कार्यक्रम चालू असताना आरोपी सभागृहात गेले होते हे स्पष्ट आहे.

12. साक्षीदार क. 1 मंगेश हा मूळ फिर्यादी असून त्याच्या जबाबात प्रथम वर्दी अहवालास निशाणी 49 देण्यात आली. प्रथम वर्दी अहवालात फिर्यादी व त्याचा भाऊ महेश हे सभागृहात गेले असता आरोपींनी त्यांना मारहाण केली, साक्षीदार क.

2 ते 4 व 6 ते 8 वगैरे सोडविण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण केली असे नमुद केले आहे. याउलट साक्षीदार क. 1 त्याच्या जबाबात असे सांगतो की, त्याला व त्याच्या भावाला मारहाण केल्यानंतर अर्धा पाऊण तासाने साक्षीदार क. 2 ते 4 व 6 ते 8 वगैरे त्याठिकाणी आले असता त्यांनाही आरोपींनी धक्काबुक्की केली. अशाप्रकारे साक्षीदार क. 1 मंगेश व साक्षीदार क. 6 महेश यांना मारहाण करताना इतर साक्षीदारांनी पाहिले असे साक्षीदार क. 1 च्या जबाबावरून दिसून येत नाही. साक्षीदार क. 2 उन्मेष त्याच्या जबाबात असे सांगतो की, कथीत घटनेच्यावेळी तो घरी होता, आरडाओरडा झाल्यानंतर काही लोकांच्या सांगण्यावरून तो तेथे गेला. साक्षीदार क. 2 त्याच्या जबाबात असे सांगतो की, आरोपींनी साक्षीदार क. 1 मंगेश व साक्षीदार क. 6 महेश या दोघांना बाहेर जा असे सांगितले व धक्का देऊन मारहाण केली. अशाप्रकारे साक्षीदार क. 2 त्याच्या जबाबात कुठेही आरोपींनी साक्षीदार क. 1 व साक्षीदार क. 6 महेश यांच्याशिवाय त्याला अगर अन्य कोणाला मारहाण केल्याचे सांगत नाही. तसेच साक्षीदार क. 3 पुजा, साक्षीदार क. 4 ज्योती त्यांच्या जबाबात कोठेही आरोपींनी त्यांना मारहाण अगर धक्काबुक्की केल्याचे सांगत नाहीत. साक्षीदार क. 6 महेश हा देखील त्याच्या जबाबात कुठेही आरोपींनी तो व साक्षीदार क. 1 यांच्याशिवाय अन्य कोणाला मारहाण केल्याचे सांगत नाही. साक्षीदार क. 7 जयेंद्र त्याच्या जबाबात आरोपींनी साक्षीदार क. 1, 6 व त्याला मारहाण केल्याचे सांगत असला तरी आरोपींनी इतर साक्षीदारांना मारहाण केल्याचे सांगत नाही.

13. फिर्यादी व आरोपी यांच्यातील राजकिय वैमनस्य पाहता आरोपींविरूध्द शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संगनमताने प्रस्तुतची खोटी फिर्याद दिली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी थोडयाफार फरकांनी एकसारखा जबाब दिला असला तरी आरोपींशी असलेल्या राजकिय वैमनस्यांतून ते जाणीवपूर्वक खोटी साक्ष देत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

14. साक्षीदार क. 10 डॉ. मुळे यांच्या जबाबात शाबीत झालेल्या निशाणी 66 व 67 येथील वैद्यकीय प्रमाणपत्राच्या अवलोकनावरून साक्षीदार क. 1 मंगेश, साक्षीदार क. 6 महेश व विकास राजे असे तिघे जण जखमी असल्याचे दिसून येते. तसेच निशाणी 66 व 67 येथील वैद्यकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये कुठेही सदर जखमांचे वय व कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे निशाणी 66 व 67 येथील वैद्यकीय प्रमाणपत्रावरून साक्षीदार क. 1 मंगेश, साक्षीदार क. 6 महेश व विकास राजे हे जखमी झाले होते, त्यांना दि. 28/02/2014 रोजी वैद्यकीय उपचार देण्यात आले असे शाबीत झाले असले तरी त्यावरून सदर जखमा व कथीत घटना यांचा परस्पर संबंध शाबीत होऊ शकला नाही.

15. याशिवाय या कामातील आरोपींनी प्रस्तुत कामातील फिर्यादी व सरकारी साक्षीदार यांच्याविरूध्द दि. 28/02/2014 रोजीच्या कथीत घटनेविषयी फौ.रे.के.क. 38/2014 दाखल केली आहे. अशाप्रकारे दोन परस्पर विरोधी राजकिय गटातील लोकांनी परस्पर विरोधी खटले दाखल केल्यामुळेही सरकार पक्षाच्या कथनांच्या विश्वासार्हतेबाबत साशंकता निर्माण होतो.

16. अशाप्रकारे सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचे जबाब परस्पर पुरक व विश्वासार्ह वाटत नाही. राजकिय वैमनस्य, फिर्याद दाखल करण्यास झालेला उशिर, त्रयस्थ साक्षीदारांचा अभाव या सर्व पार्श्वभूमीवर सरकार पक्षास आरोपींवरील दोषारोप संशयातीतरित्या शाबीत करण्यात सरकार पक्षाला अपयश आले आहे. त्यामुळे तपासी अंमलदार असलेल्या साक्षीदार क. 9 च्या जबाबाचाही सरकार पक्षाला काहीही उपयोग होऊ शकला नाही. त्यामुळे मी सर्व मुद्दयांची उत्तरे नकारार्थी देते व खालीलप्रमाणे आदेश देते –

## आदेश

1. आरोपी क. 1 ते 15 यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 255(1) अन्वये भारतीय दंड संहिता कलम 143, 147, 323, 352 सह 149 अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातून

निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

2. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलके आणि जामीन कदबे रद्द करणेत येत आहेत.

सही/–
( अ.ग.बेहेरे )
न्यायदंडाधिकारी वर्ग–1 दापोली.

दि. 05/05/2016
ठिकाण :– दापोली

## CERTIFICATE

Case No. S.C.C. No. 157/2014.

I affirm that, the contents of this pdf file judgment are same, word for word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | P. D. Bhirde. |
| Court Name | :- | A. G. Behere, C.J.J.D.& J.M.F.C., Dapoli. |
| Date of Decision | :- | 05/05/2016 |
| Judgment directly dictated on Computer on | :- | 05/05/2016 |
| Judgment signed by P.O. on | :- | 05/05/2016 |
| Judgment uploaded on | :- | 05/05/2016 |